# 2020-2021

# Sahityavrati Pusarkar 2021 Award

# Sindhoo Mandavkar





मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे
चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती

साहित्यव्रती
पुरस्कार-२०२१

मानपत्र

आदणीय ज्ञानतपस्वी **डॉ. सिंधूताई भाऊसाहेब मांडवकर**

महोदया, आपली अविरत साहित्य साधना ही उदात्त आदर्शाचा परिपाठ आहे. आपल्या व्यक्तिमत्वाला विविध आयाम प्राप्त झाले असुन साहित्यिक, सामाजिक शैक्षणिक, संस्थात्मक,वैद्यकीय, क्रीडा, सांस्कृतिक व महिला सबलीकरण क्षेत्रातील आपले उल्लेखनीय कार्य अतिशय प्रेरक स्वरुपाचे आहे.

भाऊ मांडवकरांसारख्या प्रतिभा संपन्न व्यक्तित्वाच्या सान्निध्यात वावरतांना आपण आपली साहित्यक्षेत्रातील झेप आपल्या स्वतंत्र, स्वाभिमानी वृत्तीने कायम उंचावत ठेवली.

साहित्याच्या प्रांतामध्ये आपल्या प्रतिभासंपन्न लेखणीतून सल, वेदना 'बा.स. गडकरी: जीवन आणि साहित्य,'संस्कार','आत्मानंद','चिंतन','काव्यसिंधू','सिंधू आजीच्या गोड गोष्टी इत्यादी ग्रंथरचना कथा, कविता, समीक्षा, वैचारिक लेखन, बालसाहित्य इत्यादी क्षेत्रातील आपला अधिकार सिध्द करणारी आहे.

विविध वृत्तपत्रे, मासिके, दिवाळी अंक यामधुन केलेले स्फुटलेखन विविध कार्यक्रम, आकाशवाणीवरुन केलेले चिंतने, भाषणे त्याच प्रमाणे चिंतामणी कळंबवरील आकाशवाणी मुंबई वरुन झालेले संशोधनात्मक प्रसारण इत्यादी गोष्टी आपल्या व्यासंगी चिकित्सक दृष्टीचे द्योतक आहे. आपला पीएच.डी पर्यतचा शिक्षणप्रवास वैद्यकीय क्षेत्रापासून तर प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, प्राचार्य, संस्थाप्रमुख या पदापर्यंत चा देदीप्यमान प्रेरणा-दायी प्रवास आपली परिश्रमीवृत्ती संघर्ष, मेहनत आणि चिकाटी अधोरेखित करणारा आहे.

साहित्य सागरातील आपली अथांगता नावाप्रमाणेच सार्थ ठरणारी आहे. आपल्या एकूणच साहित्यिक, सांस्कृ तिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील बहुआयामी कार्याची दखल घेवून मातृहृदयी, कुटुंबवत्सल, प्रतिभावान साहित्यिक म्हणून आपणास

**"मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे साहित्यव्रती पुरस्कार-२०२१".**

आम्ही सन्मानपूर्वक बहाल करीत आहोत.

आपल्या सर्जनशील, आरोग्यदायी व समाजोपयोगी आयुष्यासाठी असीम शुभकामना.!

प्रा. डॉ. शोभा रोकडे
संयोजक

श्री. रामचंद्रजी पोटे
अध्यक्ष

मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार समिती, अमरावती

ठवला होता. दाक्षाभूमीच्या बाहेरील परिसरात आंबेडकर साहित्य विक्री साजरा करता आल्यामुळ उत्साह ओसंडून वाहात होता. पुन्हा नव्या कोरोना रुग्णाची संख्या शून्य आहे.

# स्व. सूर्यकांतादेवी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती पुरस्कारांची घोषणा

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सिंधूताई मांडवकर होणार 'साहित्यव्रती' ने सन्मानित

**प्रतिनिधी । अमरावती**

येथील मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्टच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२१ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. सिंधुताई मांडवकर यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.


सिंधूताई मांडवकर

या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार औरंगाबाद येथील डॉ. महेश खरात यांच्या 'बुगाट' या कादंबरीला देण्यात आला आहे. तर उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार सांगली येथील दि.बा. पाटील यांच्या 'नोटबंदी' या कथासंग्रहाला मिळाला आहे. भंडारा येथील प्रमोदकुमार अणेराव यांच्या 'काही सांगताच येत नाही' या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाला असून संमिश्र विभागात ललित लेखनासाठी लासलगावच्या डॉ. प्रतिभा जाधव यांच्या 'अस्वस्थतेची डायरी' या ग्रंथाची निवड झाली आहे.

समीक्षा वाड्.मय प्रकारात दारव्हा येथील डॉ. संतोष चतूर यांच्या 'मराठी व्रतकथा आकलन व समीक्षा' या ग्रंथाला पुरस्कार देण्यात आला आहे. तर बालवाड्.मय प्रकारात नांदेड येथील सुरेश सावंत यांच्या 'गूगलबाबा' व पुणे येथील शिवाजी चाळक यांच्या 'उंदराचा टांगा' या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार विभागून देण्यात आला आहे. पाच हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

माजी राज्यमंत्री व आमदार प्रवीण पोटे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने दरवर्षी मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. तसेच विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकाच्या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. अकरा हजार रुपये रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे 'साहित्यव्रती' पुरस्काराचे स्वरूप असून हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा डॉ. सिंधूताई मांडवकर यांना त्यांच्या प्रदीर्घ व निरंतर साहित्यसेवेसाठी देण्याचा निर्णय पुरस्कार आयोजन समितीने एकमताने घेतला.

या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परिक्षकांनी परिक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या सभेत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानंतर ट्रस्टचे अध्यक्ष रामचंद्र पोटे व समितीच्या संयोजक प्रा.डॉ. शोभा रोकडे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. सभेला पुरस्कार समितीचे सदस्य प्रा. डॉ. कुमार बोबडे, प्रा डॉ. पंकज वानखडे, आर.एस.तायडे, प्रा. डॉ. मंदा नांदूरकर, संदीप देशमुख, ॲड. प्राजक्ता राऊत, वृषाली वानखेडे उपस्थित होते.

---

अमरावतीचे मातोश्री स्व.सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे वाड्मय निर्मिती पुरस्कार जाहीर...

# स्व.सूर्यकांतादेवी रा. पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड्ःमय निर्मिती पुरस्कार जाहीर

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सिंधुताई मांडवकर होणार 'साहित्यव्रती' ने सन्मानित

प्रमोदकुमार अणेराव(भंडारा), डॉ संतोष चतूर(दारव्हा), डॉ.महेश खरात(औरंगाबाद), डॉ.प्रतिभा जाधव, (लासलगाव,नाशिक), दि.बा.पाटील (सांगली),शिवाजी चाळक(पुणे), डॉ.सुरेश सावंत (नांदेड) यांना विविध पुरस्कार



अमरावती दि. १४ : मातोश्री स्व. सूर्यकांतादेवी रामचंद्रजी पोटे ट्रस्ट,अमरावती यांच्यावतीने दिल्या जाणाऱ्या २०२१ च्या उत्कृष्ट वाड्.मय निर्मिती राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून यावर्षी सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ.सिंधुताई मांडवकर यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. विविध साहित्य प्रकारासाठी राज्यातील साहित्यिकांना सन्मानीत करणारी विदर्भातील ही सर्वात मोठी पुरस्कार योजना आहे.

या पुरस्कारांमध्ये उत्कृष्ट कादंबरीसाठीचा पुरस्कार औरंगाबाद येथील डॉ.महेश खरात यांच्या 'बुगाट' या कादंबरीला देण्यात आला आहे तर उत्कृष्ट कथासंग्रहाचा पुरस्कार सांगली येथील दि.बा.पाटील यांच्या 'नोटबंदी' या कथासंग्रहाला मिळाला आहे. भंडारा येथील श्री.प्रमोदकुमार अणेराव यांच्या 'काही सांगताच येत नाही' या कवितासंग्रहाला उत्कृष्ट काव्यसंग्रहासाठी पुरस्कार जाहीर झाला असून संमिश्र विभागात ललित लेखनासाठी लासलगावच्या डॉ प्रतिभा जाधव यांच्या 'अस्वस्थतेची डायरी' या ग्रंथाची निवड झाली आहे. समीक्षा वाड्.मय प्रकारात दारव्हा येथील डॉ.संतोष चतूर यांच्या 'मराठी व्रतकथा आकलन व समीक्षा' या ग्रंथाला पुरस्कार देण्यात आला आहे तर बालवाड्.मय प्रकारात नांदेड येथील श्री सुरेश सावंत यांच्या 'गूगलबाबा' व पुणे येथील श्री शिवाजी चाळक यांच्या 'उंदराचा टांगा' या बालकाव्यसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार विभागून देण्यात आला आहे.पाच हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे .

माजी राज्यमंत्री व आमदार श्री. प्रवीणभाऊ पोटे यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या ट्रस्टच्या वतीने दरवर्षी मराठी साहित्यातील विविध लेखन प्रकारासाठी महाराष्ट्रातील साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. तसेच विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिकाच्या साहित्य सेवेची दखल घेऊन त्यांना 'साहित्यव्रती' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रु.अकरा हजार रोख, मानपत्र, शाल, श्रीफळ असे 'साहित्यव्रती' पुरस्काराचे स्वरूप असून हा प्रतिष्ठेचा पुरस्कार यंदा डॉ.सिंधुताई मांडवकर यांना त्यांच्या प्रदीर्घ व निरंतर साहित्यसेवेसाठी देण्याचा निर्णय पुरस्कार आयोजन समितीने एकमताने घेतला.

या पुरस्कार योजनेसाठी प्राप्त झालेल्या ग्रंथांचे मान्यवर परिक्षकांनी परिक्षण केल्यानंतर पुरस्कार समितीच्या सभेत यावर शिक्कामोर्तब करण्यात येऊन ट्रस्टचे अध्यक्ष मा.श्री.रामचंद्रजी पोटे, समितीच्या संयोजक प्रा.डॉ. शोभा रोकडे यांनी पुरस्कारांची घोषणा केली. सभेला पुरस्कार समितीचे सदस्य प्रा.डॉ.कुमार बोबडे, प्रा.डॉ.पंकज वानखडे, आर.एस.तायडे, प्रा.डॉ.मंदा नांदूरकर, संदिप देशमुख, ॲड.प्राजक्ता राऊत, वृषाली वानखेडे उपस्थित होते. सदर पुरस्कारांचे वितरणलवकरच एका पुरस्कार वितरण सोहळ्यात करण्यात येईल.